# 'मिळून साऱ्याजणी' नियतकालिकाचे योगदान

**प्रा.डॉ.सीमा नाईक-गोसावी**
मराठी संशोधन केंद्र,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
४१३१०२ जि.पुणे
भ्रमणभाष : ९८५०९३४३४२
ई-मेल - seemanaik69@gmail.com

'मिळून साऱ्याजणी' या स्त्रीविषयक नियतकालिकाचा पहिला अंक ४ ऑगस्ट १९८९ ला प्रकाशित झाला. प्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्या, स्त्री मासिकाच्या माजी संपादक, स्त्रियांच्या उत्थानासाठी प्रबोधन करणाऱ्या विद्या बाळ यांच्या संपादकत्वाखाली 'मिळून साऱ्याजणी' नियतकालिकांचा आरंभ झाला 'मिळून साऱ्याजणी' मध्ये मनातलं, घरातलं, दारातलं, कामकाजाच्या वेळातलं असे जे-जे काही स्त्रियांना बोलावंसं वाटेल त्यासाठी एक जागा निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे, असे विद्या बाळ यांनी मिळून साऱ्याजणी या नियतकालिकांच्या संपादकीयात म्हटले आहे. १९८९ मध्ये सुरू झालेल्या या नियतकालिकाने ३० वर्ष पूर्ण केली. ही एक विशेष नोंद घेण्यासारखी गोष्ट आहे. मराठी वाङ्‌मयात स्त्री विषयक नियतकालिके हाताच्या बोटावर मोजण्याइतकी ही नाहीत. (खरं तर ही मराठी साहित्य, समाज आणि संस्कृतीसाठी दुर्दैवी बाब म्हणावी लागेल!) ही अशी नियतकालिके बंद पडण्याचे कारण आर्थिक बाब होय. या शोधनिबंधात 'मिळून साऱ्याजणी' या नियतकालिकाने मराठी वाङ्‌मयाला काय योगदान दिले? सामाजिक योगदान काय दिले? स्त्रीवादी चळवळीशी हे नियतकालिक कसे जोडले गेले? एकूणच या नियतकालिकाने सामाजिक परिवर्तनात कसा हातभार लावला? या नियतकालिकाचे वेगळेपण काय? अशा काही मौलिक बाबींचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न, शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे.

'मिळून साऱ्याजणी' या नियतकालिकात स्त्रीविषयक प्रश्न, स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार, त्यांना माणूस म्हणून समजून न घेणे, आपली कुटुंबव्यवस्था, समाज आणि संस्कृती, परंपरा या सर्वांमध्ये स्त्रीची होणारी घुसमट, कोंडी अशा अनेक विषयांना तात्कालिक प्रश्नांनाही या नियतकालिकात स्थान मिळाले आहे. या नियतकालिकाने स्त्रियांना एक मुक्त व्यासपीठ निर्माण केले. स्त्रियांना लिहिते केले. त्यांच्या मनातील काहूर, संघर्ष, ससेहोलपट यांना मुखर केले. स्त्रीवादी चळवळीशी या नियतकालिकाने स्वभावतःच जोडून घेतले. स्त्रियांनी पुरूषांविरूध्द लढाई करायची ही स्त्रीवादी भूमिका नाही. उलट स्त्रियांनी आणि पुरूषांनी बायकी आणि पुरूषी या पारंपारिक भूमिकांमधून बाहेर पडून, माणूस म्हणून समृध्द जगण्याची वाट धरावी, ह्या स्त्रीवादी विचारधारेचा पुरस्कार या नियतकालिकाने केला.

'मिळून साऱ्याजणी' तील कविता वाचत असताना काही महत्त्वाच्या गोष्टी बाबी लक्षात येतात, निरीक्षणे नोंदवता येतात -

स्त्रिया मोठया प्रमाणात व्यक्त होऊ लागल्या आहेत.

* स्त्रिया आपल्या कवितेतून घरातील लोकांशी, समाजाशी, व्यवस्थेशी संवाद करताना दिसतात.
* स्त्रियांनी आपले भावविश्व, मनातील आंदोलने निःसंकोचपणे मांडल्याचे आढळते
* पुरूष कवींच्या कवितांमधून स्त्रियांची बाजू-भूमिका मांडलेली दिसते. ते स्त्रीसंवेदन व्यक्त करतात, तिचे मोठेपण पटल्याची कबुली देतात. 'स्त्री' ने करावयाचे काम हे फक्त तिचे नाही तर त्यात पुरूषांनी सहभागी होण्याचा पायंडा रूजविण्याचा प्रयत्न कवितेतून मांडला गेल्याचे आढळून येते. 'मिळून साऱ्याजणी' नियतकालिकाने कवितेला प्राधान्याने स्थान दिलेले असून प्रत्येक अंक कवितेच्यादृष्टीने समृध्द व संपन्न आहे.
* कवितेसोबतची रेखाचित्रे समर्पक व बोलकी आहेत.
* बालकविता, मुलांचे प्रश्न मांडणाऱ्या कविता मोजक्याच आहेत.
* स्त्रियांच्या भावविश्वाला मोकळी वाट मिळालेली दिसते. जसे सासर-माहेर, मुलगा-मुलगी, मातृत्व, मित्र-सहचर, सख्या-साऱ्याजणी, सासु-सुनेचे नाते त्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची परिमाणं या नियतकालिकाने मांडली व रूजवलेली दिसतात.
* मुक्तछंद, गझल, चारोळी, विडंबनकविता, दीर्घ कविता, निसर्गकविता, गूढकविता, प्रतिकात्मक आदिबंधात्मक, प्रतिमासंदर्भ घेऊन येणारी कविता इ. विविध उपप्रकारातून 'मिळून साऱ्याजणी' तील कविता साकारलेली आहे.
* कवी कवयित्रीने प्रतिमांचे वैशिष्ट्य-वैविध्य मोठ्या प्रमाणात मांडलेले दिसून येते. उदा. अंधारगृह, अंधारगर्भ, अंधारगुहा, काळोखकळा इ. प्रतिमा 'गर्भा' साठी कवयित्रींनी मार्मिकपणे रेखाटल्या आहेत. स्त्रियांच्या कष्टप्रद जगण्याचा संदर्भ देताना घाण्याचा बैल, यंत्र, चाकारीबध्द जीणं, रिंगण-त्रिज्या, चैतन्यहीन शरीर तसेच थरारलेली शरीरवेल, शरीरातील गंधावणे, शरीरसंवेदना इ. प्रतिमाही तदनुषंगिक येताना दिसतात.
* अहिल्या, मीरा, राधा, श्रीकृष्ण, राम कौंतेय इ. पौराणिक व आदिम संदर्भ घेऊन येणारी कविता आपले लक्ष वेधते. या प्रतिमांची पुर्नमांडणीही या कवयित्री करताना दिसतात. स्वर्ग, नरकयातना, जिण्याचं सरण, जखमेवरची खपली, पायातलं जोखड, स्मृतींची छाया, दुःखांची ओंजळ, वासंतिक वारा, बहकलेले बहर, संभ्रमाचे अथांग पाणी, हसण्याचे चूल पोतेरे, आनंदाचा शेला, काळी शाई, भिरभिरणारी स्वप्नं, मनाची विहीर, मनाचा खोलतळ, पुराणपुरूष, असीम प्रतारणा, भोगाची ठुमरी, गांधारीचं दुःख, कौंत्येयाची सत्कृत्ये, अंतर्तळ, गर्भगीते, घराची लक्तरे, देवदत्त क्षण अशा असंख्य समृध्द व समर्पक प्रतिमांनीयुक्त या कविता आहेत.

कवयित्री नीरजा, प्रज्ञा लोखंडे, अनुराधा पोतदार, अश्विनी धोंगडे, यशोधरा साठे, अंजली ठकार, वासंती मुजुमदार, निलिमा गुंडी, संगीता बर्वे, सिसिलिया कर्व्हालो, अनुराधा पाटील, सायमन मार्टिन, प्रमोद कोपर्डे, महेश केळुस्कर, मुबारक शेख, वसंत आबाजी

हाडके, प्रियदर्शन पोतदार, निरंजन उजगरे, अंजली कुलकर्णी, रोषा आर्कोटकर, ना.धों. महानोर, इंद्रजित भालेराव, नीलम माणगावे, कविता महाजन, अजय कांडर, ऐश्वर्य पाटेकर, आसावरी काकडे अशी मराठी कवितेची समृध्द परंपरा 'मि सा' ने आणखीच समर्थ केली. मिळून साऱ्याजणीतील कवितेतून स्त्रीविश्वाचा पदर उलगडायला निश्चितच मदत झाली आहे. स्त्रियांचे अंतरंग, दुःखाचा पट, बोलका व्हायला 'मि सा' तील कवितेने अवकाश मिळवून दिला आहे. फक्त स्त्रीवादी परिदृष्टीतून विचार करणारे हे नियतकालिक नाही तर माणूस 'म्हणून' जाणीवा समृध्द करणारे हे नियतकालिक आहे.

'मिळून साऱ्याजणी' नियतकालिकाने ३१ वर्षे पूर्ण केली ही अत्यंत आनंद व अभिमानाची गोष्ट आहे. चिकित्सक नजरेने बघून बदल करणे, सतत काळाबरोबर राहणे हे या मासिकाचे खास वैशिष्ट्य राहिले आहे.'[१] असे वैशाली दिवाकर म्हणतात.

'मि सा' ने विद्या बाळ अध्यासन प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पाला एक समाजशास्त्रीय महत्त्वही आहे. 'मागे वळून पाहताना', या मासिकाने काय दिले? आणि काय कमी पडले? याचा अभ्यास करणे गरजेचे वाटते आणि मिळून साऱ्याजणीच्या टीमला याप्रकारचा अभ्यास करावासा वाटतोय हेच या मासिकाचे वेगळेपण आहे,'[२] असे वैशाली दिवाकर म्हणतात.

'स्त्रीमिती'च्या संपादक डॉ. नीलिमा गुंडी आपल्या संपादकीयात म्हणतात, ''भाषेच्या आणि समाजाच्या जपणुकीसाठी नियतकालिकांची नितांत गरज असते. समाजाची केवळ जपणूक करणेच नव्हे तर समाजाला वेळोवेळी वास्तवाभिमुख करणे, त्यासाठी त्याची नव्याने उभारणी करणे, हे काम नियतकालिकातून घडत असते. मराठी भाषेचे वैचारिक चलनवलन चालू राहण्यासाठी 'मि सा' ने महत्वाची भूमिका बजावली आहे.''[३]

'मिळून साऱ्याजणी'तील कथांचे विश्लेषण करताना प्रमोदिनी वडके-कवळे म्हणतात, ''सगळ्यात जास्त कथा नातेसंबंधावर आधारित आहेत. याशिवाय समाजिक समस्या, धार्मिक किंवा सामाजिक परंपरा, स्त्री-अत्याचार, मनोविश्लेषणात्मक कथा, विज्ञानकथा, रहस्यकथा, राजकारण, शिक्षणक्षेत्रातला भ्रष्टाचार अशा वेगवेगळ्या विषयांवरच्या कथा वाचावयास मिळाल्या.'[४] पुढे त्या म्हणतात की, ''नात्यांबद्दलच्या कथांमध्ये नातेसंबंधाचे वेगवेगळे गुणाकार आहेत, पण केवळ दोन मित्रांच्या नात्यांवर आधारलेली ही कथा नाही. खेड्यातल्या कथांमध्ये अहंकार आणि स्वाभिमानाचे ताणेबाणे यापेक्षा आर्थिक विवंचना आणि रूढी, अज्ञान, व्यसन यांच्या जबरदस्त पगड्यामुळे उद्भवलेले प्रश्नच जास्त दिसून आले. कुटुंबातल्या बहुपदरी नात्यांचे ताणेबाणे सांभाळणाऱ्या कथा बहुतांशी स्त्रियांनी लिहिलेल्या आहेत. नात्यातले मैत्र सांगणाऱ्या कथा मात्र फारशा नाहीत. 'मिळून साऱ्याजणी'मध्ये लहान मुलांच्या मानसिकतेबद्दलच्या कथा तर जवळजवळ नाहीतच. स्त्रीची शारीरिक भूक आणि समलिंगी शरीरसंबंध असे नाजूक विषय देखील मोजक्याच कथांमधून हाताळले गेले आहेत.''[५] रेऊ कथा-स्पर्धा हे 'मि सा' चे खास

वैशिष्ट्य. या स्पर्धेतून अनेक चांगले कथालेखक मिळाले आहेत. शंकर विभुते, ज्योती आठल्ये, पूनम बा. मं., जगदीश पाटील, अभय वळसंगकर, मुक्ता बा. मं., अशोक करंदीकर यांच्या कथा उल्लेखनीय वाटल्या.

'मिळून साऱ्याजणी'ची वैशिष्ट्ये सांगताना डॉ. नीलिमा गुंडी म्हणतात, "नवनवी सदरे, संवेदनशील वाचकांना आवाहन करणारी मुखपृष्ठे (उदा. मे २००८ चे दगडखाण महिला कामगारांचे दर्शन घडवणारे मुखपृष्ठ, तसेच दशकपूर्ती विशेषांकाचे मुखपृष्ठ) संगीत साहित्य-पत्रकारिका-विज्ञान-लोककला अशा संपन्न सांस्कृतिक जगाचे दर्शन आणि वाचकांना बोलते करण्याची हातोटी ही 'मिळून साऱ्याजणी'ची वैशिष्ट्ये आहेत. मासिकाने वेळोवेळी न्यायसंस्था, राजकारण, अर्थकारण, जागतिकीकरणाचे संभाव्य परिणाम, चंगळवादातील धोके अशा विषयांवर जनजागरण घडवले आहे. नर्मदा धरणग्रस्तांचा लढा, भवरीदेवीचा लढा, अण्वस्त्र बंदीसाठीचे लढे, महिला आरक्षण प्रश्न अशा महत्त्वाच्या प्रश्नांकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. वाचकांची 'बोलकी पत्र' वाचतना वाचकही मासिकाकडे अभिव्यक्तीसाठीचे हक्काचे 'व्यासपीठ' म्हणून पाहात असल्याचे लक्षात येते.''

'मि सा' सिध्दांत आणि अनुभव यांना जोडणारा पूल झाला आहे.' असे वैशाली जोशी म्हणतात. स्त्रियांसाठीचा मुक्त अवकाश अशी जरी या मासिकाची मुख्य ओळख असली तरी समग्र समाजपरिवर्तन हा 'मि सा' चा केंद्रबिंदू आहे असे वैशाली जोशी म्हणतात.

खरोखरच समाजाभिमुख भूमिकेतून मनपरिवर्तन शक्य आहे, यावर या नियतकालिकाचा भर आहे. कोणत्याही एका विचारसरणीच्या चौकटीत न अडकता लोकशाही, समानता आणि बंधुभाव अशा मुलभूत मानवी मूल्यांशी 'मि सा' ने बांधिलकी जपली आहे.

'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या ३१ वर्षात २० वर्षे संपादक म्हणून विद्याबाळ यांनी 'संवाद' हे संपादकीय लिहिले व संवादी सूर रूजवला. पुढे डॉ.गीताली वि. म. यांनी ११ वर्ष 'संवाद' साधला आहे. मानवी नाते, स्त्रियांचे प्रश्न, समाजकारण, पर्यावरण जागृती, बळीराजाची स्थिती, अंध-अपंग यांचे प्रश्न, सामाजिक न्याय इ. प्रश्नांवर 'संवाद' मधून परस्पर साहचर्याच्या भूमिकेतून शांततापूर्ण मार्गाने-मूल्याधिष्ठित सुसंवादी पध्दतीने त्यांनी निकोप समाजनिर्मितीचे स्वप्न पाहिलेले दिसते.

एकूणच 'मिळून साऱ्याजणी' नियतकालिकाने जगाला व्यापून उरणारे स्त्रीविश्व आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. इतर नियतकालिकांच्या तुलनेत स्त्रीप्रश्नांना स्वतंत्र वा इतके मोठे स्थान कधीही मिळालेले नाही. 'मिळून साऱ्याजणी'ने स्त्री प्रश्नांची चिकित्सा केली, चर्चा घडवली, स्त्रिया या माणूस आहेत हा विचार रूजविला. त्यासाठी जागृतीचा कंदील हाती घेतला. स्त्रीला आत्मनिर्भर बनविले, विचारप्रवृत्त बनविले.

'मिळून साऱ्याजणी' हे नियतकालिक स्त्रियांना 'सखी' सारखी हक्काची जागा, हक्काचे व्यासपीठ असल्याचे जाणवले. स्त्रिया धीटाईने मनातले मांडू लागल्या. स्त्री-पुरूष समानता स्वीकारणाऱ्या पुरूषवर्गाची संख्या समाजात वाढू लागली. 'मिळून साऱ्याजणी' हे केवळ स्त्रियांना माणूस म्हणून वागवणारा पुरूषवर्ग अशा कितीतरी समूहांचा पाठिंबा व लेखन 'मिळून साऱ्याजणी'स मिळत गेले.

'मिळून साऱ्याजणी'चा जीव जरी अल्प असला तरी तिने केलेली धडपड, तळमळ प्रयत्न हे कार्याशी प्रामाणिक असल्यामुळे समाजात रूजत चालले आहेत. विस्तारत चालले आहे. लेखक, कवी, कवयित्री या सर्व स्तरातून, समाजगटातून आलेल्या दिसतात.महाराष्ट्रबाहेरील बृहन्न-महाराष्ट्र म्हणून अशा आणंद (गुजरात), कटक (ओडीसा), मद्रास, नवी दिल्ली, मध्यप्रदेश, कर्नाटक, बेंगलोर, हरियाणा अशा सर्व भागातून लेखन आलेले आहे. अमेरिका, युके अशा देशातून प्रतिसाद मिळतो. मुस्लिम, दलित व आदिवासी वर्गातील लेखिका मात्र नामनात्र आहेत.

मराठी वाङ्‌मय जगतात 'मिळून साऱ्याजणी' हे नियतकालिक वैचारिक भरण-पोषण करण्याचे काम करीत आहे. आपल्या सभोवतालचा शक्य तेवढा अंधार-काळोख दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे. गेली ३० वर्ष हे नियतकालिक प्रकाशबीजे पेरण्याचे काम करीत आहे. एकूण 'मिळून साऱ्याजणी'ने स्त्रीविश्वावर समाजाला संवादी बनविले. त्यांचा प्रदेश बोलका केला. यामुळे समाजपरिवर्तनाला काही प्रमाणात का होईना गती मिळाली हेच 'मिळून साऱ्याजणी' नियतकालिकाचे योगदान आहे.

**संदर्भ :**

१. गीताली वि.म. (संपा.), 'मिळून साऱ्याजणी', अंक जानेवारी २०२२, पृ.क्र.२०
२. तत्रैव, (१) पृ.क्र.२०
३. गुंडी नीलिमा (संपा.), 'स्त्रीमिती', निवडक मिळून साऱ्याजणी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१०, पृ.क्र.१
४. गीताला वि.म. (संपा.), 'मिळून साऱ्याजणी', अंक जानेवारी २०२२, पृ.क्र.५३
५. तत्रैव, (१) पृ.क्र.५३
६. तत्रैव, (४) पृ.क्र.५३
७. गुंडी नीलिमा (संपा.), 'स्त्रीमिती', निवडक मिळून साऱ्याजणी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१०, पृ.क्र.३
८. तत्रैव, (७) पृ.क्र.३२

***